# नाशिक 'रन' मध्ये धावले ३०० हुन अधिक खेळाडू

**नाशिक । प्रतिनिधी**

समाज सेवेच्या उदात्त भावनेतून १५ हजारोंवर नाशिककर गुलाबी थंडी मध्ये धावले तर नाशिक रन मॅरेथॉनमध्ये नाशिकचे लोकप्रिय आयुक्त विश्वास पाटील यांच्यासह १० किलोमीटर मॅरेथॉन मध्ये सहभाग नोंदवला.

नाशिक रनला प्रमुख पाहुणे म्हणून बॉश इंडियाचे व्यवसथापकीय संचालक सौमित्र भट्टाचार्य, टीडीके इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक एन. बालाकृष्णन, नाशिकचे महापौर सतीश कुलकर्णी, नाशिक रनचे अध्यक्ष एच. एस. बॅनर्जी, उपाध्यक्ष रमेश जी. आर., सचिव अनिल दैठणकार, खजिनदार राजाराम कासार, विश्वस्त प्रवल रे, श्री अनंतरामन, अशोक पाटील, श्रीकांत चव्हाण, मुकुंद भट, पॉवर ट्रेन बॉशचे विभागीय अध्यक्ष जॉन ओलिव्हर, बॉश इंडियाचे सह संचालक एस. सी श्रीनिवासन, संदीप नालामंगला, बॉश इंडियाचे बिदाडी प्लांट हेड ची.गरील इशीपव, बॉश इंडिया चे सहसंचालक ची. कार्स्टन म्युलर, टीडीकेचे अध्यक्ष **(पान ७ वर)**



## आयुक्त विश्वास नांगरेही धावले

समाज सेवेच्या उदात्त हेतूने गुलाबी थंडीत धावले पंधरा हजारहून अधिक नाशिककर तर सुदृढ आरोग्याचा मूलमंत्र देण्यासाठी पोलीस आयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्यासह नाशिक रन मॅरेथॉनमध्ये धावले ३०० हुन अधिक खेळाडू व १५ हजारावर नाशिककरांनी या रनमध्ये सहभाग घेतला. सकाळी ७.३० ते ७.५५ या कालावधीत प्रमुख पाहुण्यांचे व नाशिक रन मध्ये सहभाग नोंदविनारे नाशिक कारांचे आगमन झाले, सकाळी ८ ते ८.१० या वेळेत नाशिक रन चे प्रमुख पाहुण्यांचे उपस्थित हवेत फुगे सोडून उद्घाटन झाले व राष्ट्र ध्वज फडकविण्यात येवून राष्ट्रगीत झाले. तसेच यावेळी विविध सांस्कृतीक कार्यक्रम घेण्यात आले.

## विविध गटातील प्रथम विजेते

१० किलोमीटर मॅरोथॉन स्पर्धेत १५ ते ३५ वयोगटात महिला वर्गात प्रथम क्रमांक योगिता वाघ, द्वितीय दिशा बोरसे तर तृतीय क्रमांक निवृत्ता थवड यांनी पटकाविला. ३६ ते ५० महिला वयोगटात प्रथम क्रमांक अश्विनी देवरे, द्वितीय नितु सिंग तर तृतीय नीता नारंग यांनी पटकावला. ५१ ते ९९ महिला वयोगटात प्रथम क्रमांक सुचिता पालवे, द्वितीय कल्पना कुशारे तर तृतीय रेवती चिटको यांनी पटकाविला. पुरुष १५ ते ३५ वयोगटात प्रथम क्रमांक रोहित यादव, द्वितीय सुनीत कुमार तर तृतिय क्रमांक रवी कुमार यांनी पटकाविला. पुरुष गट ३६ ते ५० वर्षे प्रथम क्रमांक सवळीराम शिंदे, द्वितीय संतोष वाघ, तृतीय नंदू उगले यांनी पटकाविला. पुरुष गट ५१ ते ९९ वर्षे प्रथम क्रमांक हरीश चंद्र, द्वितीय वसंतराव कचरू तृतीय दिनकर शेळके यांनी पटकाविला.

Scanned by CamScanner